**मुल,जि.चंद्रपुर येथे पदविका अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन सुरु करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.** HTED-14011/885750/2025-MHT-(TE-5)
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक:- ०४.११.२०२५.

**संदर्भ:-** १) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे जा.क्र.१०/ एनजीपी/चंद्रपुर शा.तं.मुल प्रस्ताव /२०२५/१३८, दिनांक २९.०४.२०२५ .
२) मा.मंत्रिमंडळाच्या दि.०४.११.२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णय.

**प्रस्तावना :-**

चंद्रपूर जिल्हा हा खनीज संपत्ती आणि वने यांनी व्याप्त आहे. या जिल्ह्यामध्ये भरपूर सिमेंट, विज, तसेच लोह तयार करणारे प्रकल्प आहेत. त्यामुळे वाहतूक, दळणवळण व इमारती बांधकाम यासाठी भरपूर वाव आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील एकुण विजनिर्मिती तसेच औद्योगिक क्षेत्रातील गरज लक्षात घेता पदविका अभियंते यांची निकड भासते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार देशामध्ये कौशल्य मनुष्यबळाची गरज आहे या धोरणानुसार प्रत्येक भागातील भौगोलिक परिस्थितीनुसार लागणारे आवश्यक तंत्रज्ञ तयार करणे ही काळाची गरज आहे. मूल येथे लोहनिर्मीती कारखाना व इतर औद्योगिक संस्थाने त्यांच्या कारखान्याची उभारणी करत आहेत. खणिकर्म, ऑटोमेशन, दूरसंचार, बांधकाम, वीज निर्मिती, लोहनिर्मीती इत्यादी क्षेत्रांमध्ये मोठा औद्योगिक विस्तार विचारात घेता मूल येथे प्रस्तावित असलेल्या औद्योगिक क्षेत्राकरीता अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील मनुष्यबळाची गरज आहे .

२. मूल,जि.चंद्रपुर येथे सुरु असलेल्या उद्योगासाठी कुशल मनुष्यबळ व स्थानिक युवकांना रोजगारासाठी तांत्रिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्याची मागणी विचारात घेवुन मूल, जि. चंद्रपुर येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यानुषंगाने मंत्रिमंडळाच्या दि.०४.११.२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार यासंदर्भात खालील निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

मंत्रीमंडळाच्या उपरोक्त नमुद बैठकीत झालेल्या निर्णयानुसार मुल,जि.चंद्रपुर येथे पदविका अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यास या शासन निर्णयाद्वारे खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

I) मुल, चि.चंद्रपुर येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन पदविका अभियांत्रिकी शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | सिव्हिल इंजिनिअरींग | ६० |
| २ | इलेक्ट्रिकल इंजिनिअरींग | ६० |
| ३ | इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकॉम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० |
| ४ | कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग | ६० |
| ५ | मायनिंग इंजिनिअरींग | ६० |
| | **एकूण** | **३००** |

II) मुल,चि.चंद्रपुर येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्याकरिता टप्याटप्याने एकुण ३९ शिक्षकीय व ४२ शिक्षकेतर कर्मचारी पदे मंजुर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

III) मुल,चि.चंद्रपुर येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरु करण्याकरिता टप्याटप्याने होणा-या आवर्ती खर्च रु.२२६९.५८ लक्ष व अनावर्ती खर्च रु.१५१२१.५ लक्ष अशा एकुण रुपये १७३९१.०८ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयाच्या अनुषंगाने संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय यांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करावी.

३. सदर शासन निर्णय मंत्रीमंडळाच्या दि.०४.११.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५११०४१६०७३०३२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SANTOSH
PUNAMCHAND
KHORGADE

Digitally signed by SANTOSH PUNAMCHAND KHORGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Higher and Technical Education,
2.5.4.20=C0546ACCA372CE2D8EDBE5DC7949386DAF8955A34DFDA38BF6F34CE12B899EA7, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=08CF3286085F1309FD153E0C9A31F18D1C3CE4865E7DF75B4F8AA7B75A9A81EA, cn=SANTOSH PUNAMCHAND KHORGADE
Date: 2025.11.04 16:09:24 +05'30'

**(संतोष खोरगडे)**
**सहसचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) अपर मुख्य सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई.
६) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७) संचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई.
८) महालेखापाल-१/२, लेखा व अनुज्ञेयता,महाराष्ट्र मुंबई/नागपूर,
९) महालेखापाल-१/२, लेखा परीक्षा ,महाराष्ट्र मुंबई/नागपूर,
१०) संचालक, लेखा व कोषागार संचालनालय, मुंबई,
११) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
१२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३) वित्त विभाग, व्यय-५/आपुक, मंत्रालय, मुंबई,
१४) निवड नस्ती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग/तांशि-५.


आपण सी.सी.टी.व्ही. च्या निगराणित आहात
DO NOT SPIT
शासकीय तंत्रनिकेतन,मूल
सुस्वागतम
GPS Map Camera
Mul, Maharashtra, India
3m9j+cvw, Mul, Maharashtra 441224, India
Lat 20.06872° Long 79.682276°
Monday, 02/02/2026 03:40 PM GMT +05:30
Google